# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा / 7385
दिनांक :- १६/०३/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा एप्रिल/मे २०२१ च्या वेळापत्रकाबाबत...**

**संदर्भ:- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा -६ /१०८१/ दिनांक २७/०२/२०२१**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की एप्रिल/ मे २०२१ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.नं. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा,(लेखी परीक्षा) | गुरूवार दिनांक २९/०४/२०२१ ते गुरूवार दिनांक २० मे २०२१ |
| २) | प्रात्यक्षिक, श्रेणी व तोंडी परीक्षा | सोमवार दिनांक १२/०४/२०२१ ते बुधवार दिनांक २८/०४/२०२१ |
| ३) | तंत्र व NSQF अंतर्गतपूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा (जुना व नवीन अभ्यासक्रम) | |
| ४) | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ५) | आउट ऑफ टर्न परीक्षा | शुक्रवार दिनांक २१/०५/२०२१ ते शनिवार दिनांक २२/०५/२०२१ |
| ६) | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यानुभव विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | शुक्रवार दिनांक २१/०५/२०२१ ते मंगळवार दिनांक ०१/०६/२०२१(विषय निहाय तारखा वेळापत्रकात नमुद केल्या जातील त्यानुसार परीक्षा घ्यावी) |

सदर परीक्षेसाठी खालील सुचनानुसार कार्यवाही करावी :-

१) विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने घेण्यात येईल

२) नियमित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यानुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दि.२१/०५/२०२१ ते ०१/०६/२०२१ कालावधीत संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावरून प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.

३) वर नमूद केलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य कार्यानुभवाचे विषय घेवून विद्यार्थी श्रेणी परीक्षेस प्रविष्ट होत असल्यास वरील निर्धारीत कालावधीतच सदर विषयांची परीक्षा आयोजित करावी.

४) विद्यार्थी संख्येनुसार शाळानी उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत दिनांक (१२/०४/२०२१ ते २८/०४/२०२१) तोंडी परीक्षा/श्रेणी परीक्षा घेणे, संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच ठळक अक्षरात फळ्यावर दर्शनी भागावर सुचना लावण्यात यावी व विद्यार्थ्यांना अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

५) अंध, मुकबधिर, अपंग व बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा दि. २१/०५/२०२१ ते ०१/०६/२०२१ या कालावधीतच आयोजित करण्यात याव्यात.

६) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षे-सोबतच अन्य विषयाची तोंडी व श्रेणी परीक्षा नमूद दिनांकासच आयोजीत करावे. सदर परीक्षेचे वेळापत्रक संबंधित शाळांनी विभागीय मंडळाकडे परीक्षेपूर्वी पाठवावे. त्यानुसार सदर परीक्षा कालावधीत विभागीय मंडळाचे भरारी पथक शाळेना भेटी देतील.

७) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा Out of Turn परीक्षा दिनांक शुक्रवार २१/०५/२०२१ व दिनांक शनिवार २२/०५/२०२१ आयोजीत करण्यात येणार आहेत. सदरची बाब सर्व माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी जेणेकरून कोणताही विदयार्थी परीक्षेपासून वंचीत राहणार नाही. याची नोंद घेवून विदयार्थ्यास सुचना देण्यात याव्यात.

८) प्रात्यक्षिक व श्रेणी परीक्षेचे साहित्य स्विकारण्याच्या व जमा करण्याच्या तारखा स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील त्या तारखेस साहित्य घेवून जाण्याची दक्षता व साहित्य जमा करण्याची दक्षता घ्यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर